# जाहिरात

## महाराष्ट्र राज्य महिला आयोग

**गृहनिर्माण भवन, म्हाडा बिल्डिंग, पोटमाळा, कलानगर, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१**

क्रमांक : ममआ-२०१९/संप्र,प्रका/का-१ दिनांक : २२/०७/२०१९

## शुध्दीपत्रक

**वाचा : क्र. ममआ-२०१९/संप्र,प्रका/का-१,दि.११.०७.२०१९ ची जाहिरात**

**विषयः- (अ) संशोधन प्रकल्पांना अनुदान देण्याबाबत**
**(ब) महिलांमध्ये डिजिटल साक्षरता विषयक प्रशिक्षण/ कार्यशाळांना अनुदान देण्याबाबत**

महाराष्ट्र राज्य महिला आयोग स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी, स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारण्यसाठी तसेच त्यांच्या न्याय हक्कांसाठी कार्य करीत आहे. त्या अनुषंगाने महिलांविषयक संशोधनासाठी "निवडक संशोधन प्रकल्प आणि "महिलांमध्ये डिजिटल साक्षरता विषयक प्रशिक्षण/कार्यशाळा" (महिलांना डिजिटल साक्षर करण्यासाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण देणे) यासाठी शैक्षणिक संस्था/सामाजिक संस्था/संशोधन संस्था यांना अनुदान वितरित करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर (अ) संशोधन प्रकल्प (ब) "महिलांमध्ये डिजिटल साक्षरता विषयक प्रशिक्षण /कार्यशाळा (महिलांना डिजिटल साक्षर करण्यासाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण देणे) यांचे प्रस्ताव सादर करण्याचा नमुना व सविस्तर माहिती महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या संकेतस्थळ [Website] http://mscw.org.in यावर उपलब्ध आहे. कृपया अधिक माहितीसाठी सदर संकेतस्थळास भेट द्यावी. इच्छुकांनी विहित नमुन्यातील आपले प्रस्ताव सीलबंद लिफाफ्यात दिनांक ३०/०७/२०१९ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. त्याबाबतची जाहिरात दि.११.०७.२०१९ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्द् झाली होती. **अर्ज दाखल करण्यास सुदतवाढ देण्यात येत असून दि.१४.०८.२०१९ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत** महाराष्ट्र राज्य महिला आयोग, गृहनिर्माण भवन, म्हाडा बिल्डिंग, पोटमाळा, कलानगर, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१येथे प्राप्त होतील, असे स्पीड पोस्टाने/रजिस्टर पोस्टाने पाठवावेत. यामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार महाराष्ट्र राज्य महिला आयोग राखून ठेवत आहे.

**सही/-**

**ठिकाण** : वांद्रे पूर्व
**दिनांक** : २२/०७/२०१९

**सदस्य सचिव.**
**महाराष्ट्र राज्य महिला आयोग**